| | |
|---|---|
| MHSN060018302012 | R.C.S. 700506/2012<br>Dhondiram Rayappa Bandgar Vs.<br>Shashikant Sidrappa Bandgar |

**<u>निशाणी ७६ वरील आदेश</u>**

०१. वादीने सदरचा अर्ज दाखल केला असून त्यांचे कथन आहे की, वादीने सरतपासाचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे तसेच त्यांचा अंशतः उलटतपासही झालेला आहे. सदर सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामध्ये वादी यांनी त्यांनी दाखल केलेली कागदपत्रे नमूद केलेली आहेत. तसेच ती कायदेशीररित्या शाबीत केलेली आहेत. परंतु सदर कागदपत्रांना नजरचुकीने निशाणी देणेचे राहून गेलेले आहे. त्यामुळे अर्जात नमूद केलेल्या कागदपत्रांना निशाणी देणेत यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांनी सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन आक्षेप घेतला आहे. त्यांचे कथन आहे की, प्रस्तुत अर्जात नमूद कागदपत्रांबाबत वादीने केवळ ३/२ साठेखताबाबत सरतपासामध्ये उल्लेख केलेला आढळून येतो. तो देखील शाबीत करण्याची जबाबदारी वादीवर आहे. प्रस्तुत अर्जात दाखल केलेले इतर कागदपत्रांबाबत शपथपत्रात उल्लेख नसल्यामुळे त्यास निशाणी देता येणार नसल्याचे कथन केलेले आहे.

०३. वादीचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०४. सदर प्रकरणात वादीने निशाणी ३०/१ खाली जिल्हा न्यायालय, सांगली येथील कि.अ.नं. १३७/२००४ चा न्यायनिर्णय, निशाणी ३०/२ खाली दिवाणी न्यायालय, मिरज येथील रे.दि.मु.नं. १८०/१९९९ मधील प्रतिवादीचा जबाब आणि निशाणी ३०/५ खाली दिवाणी न्यायालय, मिरज येथील रे.दि.मु.नं. १८०/१९९९ मधील न्यायनिर्णय यांच्या सही शिक्याच्या नक्कला दाखल केलेल्या आहेत. तसेच त्याबाबत वादीच्या सरतपासामध्ये देखील उल्लेख केलेला आहे. त्याचप्रमाणे वादी यांनी निशाणी ३०/३ खाली दैनिक केसरी या वृत्तपत्रात दिलेली बातमी हजर केलेली आहे. त्याचप्रमाणे निशाणी ३/२ कडे वादी व प्रतिवादी यांचेमध्ये झालेल्या रजिस्टर साठेखताची अस्सल प्रत दाखल केलेली आहे. सदरच्या साठेखताबद्दल वादीनी सरतपासात उल्लेख केलेला आहे. त्याप्रमाणे निशाणी ३/३ कडे वादी यांनी प्रतिवादी यांना पाठविलेल्या नोटीसीची स्थळप्रत तसेच निशाणी ३/४ कडे प्रतिवादी यांना नोटीस मिळालेची पोहोच पावती दाखल केलेली

आहे. यातील वादी यांनी निशाणी ३०/१, ३०/२ आणि ३०/५ कडे दाखल केलेली कागदपत्रे ही सहीशिक्याची नक्कला असल्याने त्यास निशाणी देणे योग्य वाटते. त्याचप्रमाणे साठेखतावर वादी याची सही असून त्याबाबत वादी यांनी सरतपासामध्ये कथन केलेले आहे. त्यामुळे सदरच्या साठेखत हे भारतीय पुरावा कायद्याप्रमाणे सिध्द करण्याची जबाबदारी वादी याचेवरती ठेऊन सदर साठेखतास निशाणी देण्यात येते. त्याचप्रमाणे वादीने पाठविलेली नोटीस व पोहोच पावती यास देखील निशाणी देण्यात येते. वादीने दाखल केलेले बातमीमधील मजकूर हा पुराव्याचा भाग असल्याने सदरच्या वृत्तमानपत्रास केवळ ओळखीकरीता निशाणी देण्यात येते. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने सदर अर्जामध्ये नमूद केलेल्या कागदपत्रांना निशाणी देण्यात येते.

ANIRUDHA SUNIL RANE

Digitally signed by ANIRUDHA SUNIL RANE
Date: 2025.11.19 11:39:37 +0530

ठिकाण–मिरज.
दिनांक–१७.११.२०२५.

(अनिरुध्द एस. राणे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Mr. S. S. Shingana | | |
| Name of Court | :- | Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Miraj, Dist., Sangli. | | |
| Date of decision / typed | :- | 17 | 11 | 2024 |
| Judgment/order signed by the P.O. on | :- | 17 | 11 | 2024 |
| Judgment/order uploaded on | :- | 18 | 11 | 2024 |